ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. R. 5434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १३ मे, १९५९ | अंक १९

## विविध माहिती

**शुश्रूषाविषयक पदवी**—आंध्र सरकारनें पुढील शैक्षणिक वर्षापासून शुश्रूषाविषयक अभ्यासक्रमासाठी एक कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. कॉलेजांत ४ वर्षांचा अभ्यासक्रम पुरा करून शुश्रूषा विषयाची पदवी घेतां येईल. हें कॉलेज एका इस्पितळाशीं संलग्न करण्यांत येणार आहे. कॉलेजच्या इमारतीसाठी १३ लाख रुपयांची मदत मंजूर केली असून परदेशांकडून तांत्रिक साह्य मिळविण्यांत येणार आहे.

**आमदारांसाठी रहाण्याची सोय**—त्रिवेंद्रम येथें आमदारांसाठी बांधण्यांत आलेल्या वसतिगृहाचें उद्‌घाटन करण्यांत आलें. वसतिगृह बांधण्यासाठी ७ लाख रुपये खर्च आला आहे. इमारत दोन मजली असून तींत ५२ खोल्या आहेत. त्याशिवाय एक सभागृह, वाचनालय आणि करमणुकीचें दालन ह्यांचीहि सोय करण्यांत आली आहे. इमारतीचें उद्‌घाटन मुख्य मंत्रि श्री. नंबुद्रीपाद ह्यांनीं केलें.

**आंब्यांच्या फळांचें प्रदर्शन**—इंडिअन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेतर्फे जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत आंब्यांच्या फळांचें एक प्रदर्शन कलकत्ता येथें भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांतील स्पर्धेत यशस्वी होणाऱ्यांसाठी १३ ढाली व कित्येक पेले ठेवण्यांत येणार आहेत. त्याशिवाय ३,००० रुपयांचीं रोख बक्षिसेंहि देण्यांत येणार आहेत.

**कागदाच्या गिरण्या काढण्यास वाव**—भारतांत कागदाच्या गिरण्या काढण्यास अनुकूल परिस्थिति कोठें आहे तें पहाण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें आपल्या अहवालांत असें नमूद केलें आहे कीं, आसाम, म्हैसूर, मद्रास, मुंबई आणि केरळ ह्या राज्यांतून कागदाच्या कारखान्यांसाठी लागणारा कच्चा माल मिळूं शकेल.

**व्यापारी मंडळाचें प्रयाण**—भारत सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याचे एक मंडळ विमानानें मॉस्कोला रवाना झाले रशिआचा दौरा झाल्यावर मंडळ पूर्व युरोपांतील रुमेनिआ, बल्गेरिआ, हंगेरी, इत्यादि देशांचा पांच आठवड्यांचा दौरा करणार आहे. ह्या देशांशीं पूर्वी करण्यांत आलेल्या व्यापारी करारांचें नूतनीकरण करण्याबद्दल मंडळ बोलणीं करणार आहे.

**महाबळेश्वरला बालकांचें उद्यान**—महाबळेश्वर येथें लहान मुलांच्या खेळण्यासाठी व त्यांचें मनरंजन करण्यासाठी एक उद्यान तयार करण्यांत येणार आहे. उद्यानाची जागा १२ एकर पसरलेली असेल व त्यामधील रचना जपानी पद्धतीची करण्यांत येईल. उद्यानासाठी ८०,००० रुपये खर्च येईल. मुलांना स्थानिक वनस्पतींची माहिती होण्यासाठीं एक वनस्पति संग्रहालयहि उभारण्यांत येईल.

**वैद्यकीय कॉलेजांना मदत**—भारत सरकारनें राज्यसरकारांना असें कळविलें आहे कीं, त्यांनीं आपल्या राज्यांतील वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांचा विस्तार करण्याचें ठरविल्यास त्या कामीं सरकार मदत करील. प्रत्येक संस्थेनें आपल्या संस्थेंत प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १५० पर्यंत वाढविली तर सरकार त्याचें स्वागत करील.

**विमान प्रवासाची शीघ्र गति**—न्यूयॉर्क ते लंडन हें अंतर हवाई मार्गानें ३,६५० मैलांचें आहे. हें अंतर अमेरिकन एअरवेज कंपनीच्या बोइंग जेट विमानानें ७ तास, ७ मिनिटांत तोडलें. ह्या पूर्वी पॅन अमेरिकन कंपनीच्या विमानाला ह्याच प्रवासास १० मिनिटें जास्त लागलीं होतीं. विमानांत ११ उतारू होते.

**इटलीच्या सरकारच्या शिष्यवृत्त्या**—इटलीच्या सरकारनें १९५९-६० सालासाठी हिंदी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊं केल्या आहेत. शिष्यवृत्त्यांचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं इटलींत जाऊन पदवीनंतरच्या अभ्यासक्रमांतील संशोधन करावयाचें आहे. गेल्या वर्षी इटलीतर्फे पांच शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या होत्या. ह्या वर्षी त्यांची संख्या ३० करण्यांत आली आहे.

**ढेकणांच्या निर्यातीनें प्राप्ति**—पाकिस्तानमधील वृत्तपत्रांतून ढेकणांना न मारतां जमवून परदेशीं पाठविण्यासंबंधीं जाहिराती आल्या आहेत. प्रत्येक औंस वजनाच्या ढेकणासाठी २५ रुपये देण्यांत येणार आहेत. मात्र हे ढेकूण जिवंत असले पाहिजेत. ढेकणांना विमानानें अमेरिकेला धाडण्यांत येणार आहे. वाटेंत ते मरूं नयेत म्हणून त्यांना खायहि पुरविण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## नगरपालिका व अर्वांतर आंतरराष्ट्रीय विषय

### कामकाजाची व्याप्ति मर्यादित करण्याची आवश्यकता

( लेखकः—नारायण विनायक मोंडे, वकील, पुणें. )

"The Corporation is a creature of a statute and is created for certain purposes only. Its range of thought and discussion must be confined within the ambit of the purposes for which it has been created. There is no limit to the thought of a natural person but there is a limit to the power of discussion of a Corporation." —न्या. के. टी. देसाई,

इंग्लंडचा माजी पंतप्रधान इम्रे नागी याच्या फांशीबावत मुंबई महानगरपालिकेपुढें एक कॉंग्रेस सदस्य डॉ. आर. एन्. कुलकर्णी यांनीं मतप्रदर्शित करणारा ठराव दिनांक १० जुलै १९५८ रोजीं आणला होता. असा ठराव म्युनिसिपल कायद्याचे चौकटींत बसत नाहीं, या मुद्यावर संयुक्त महाराष्ट्र समितीचे एक सभासद श्री. आर. एस. बेलोसे यांनीं नगरपालिकेविरुद्ध मुंबई हायकोर्टांत अर्ज करून ठरावाचे चर्चेस मनाई व ताकीद मागितली; व न्यायमूर्ति के. टी देसाई यांनीं सदर अर्ज मंजूर करून निरंतरची ताकीद दिली. त्याविरुद्ध महानगरपालिकेनें अपील केलें व त्याचा निकाल सर न्यायाधिश चैनानी व न्यायमूर्ति व्यास यांनीं देऊन खालील कोर्टाचा निर्णय फिरवून सदर ठरावाची चर्चा अनधिकृत व विधिबाह्य नाहीं असा निर्णय दिला.

#### लवचिक कलमाचा दुरुपयोग

नामदार हायकोर्टाचे या निकालानें स्थानिक स्वराज्य संस्थांचे हितचिंतकांत मोठी खळबळ उठणें हें सहाजिक आहे. विषयाचा म्युनिसिपल कारभाराशीं काडीचाहि संबंध नाहीं असे विषय नगरपालिकेंत प्रविष्ट होण्यास मुभा मिळाली तर किती विचका व अनवस्था प्रसंग निर्माण होतील हें सांगणें नकोच आणि असे प्रसंग मुंबई, पुणें, अहमदाबाद, वगैरे महानगर पालिकेंतच नव्हे, तर बरो, शहर व डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटींतहि निर्माण होतील. कारण, या बहुतेक कायद्यांत सारखीच तरतूद आहे. "उपरिनिर्दिष्ट कलमांत नमूद न केलेली इतर कोणतीहि बाब ज्याचे योगें सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य, सोय अथवा शिक्षण यांच्या प्रसारास मदत होईल 'अशी कोणतीहि बाब' विचारांत घेण्यास हरकत नाहीं," अशा रीतीची तरतूद १८८८ चें बॉंबे कॉर्पोरेशन ॲक्टाचें कलम ६३ क, १९४९ चें प्रॉ. म्यु. कॉ. चें कलम ६६ (४२), १९२५ चें म्युनिसिपल बरोज ॲक्टाचें कलम ७१–आर. व १९०१ चें डि. म्यु. ॲक्टचें कलम ५६ एल. या सर्वांत सारख्याच आहेत. ह्या लवचिक शब्दसमुच्चयाचा दुरुपयोग आतांपर्यंत कांहीं वेळां कांहीं नगरपालिकांनीं केला. पण आतां हायकोर्टाचे निकालानें ह्या पोट–कलमाचा मनमुराद उपयोग करण्यास त्यांस सनदच मिळाली आहे. मात्र लोकल बोर्ड ॲक्ट, १९२३ चें कलम ५० एन् मध्यें "Any other *local* works or measures likely to promote public safety, conveniences or education"—असा शब्दप्रयोग आहे.

नामदार हायकोर्टाच्या निकालाचा सरळ अर्थ असा कीं, जगांतील कोणत्याहि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राबरोबर कांहीं कृत्य केलें असल्यास त्या विषयासंबंधानें विचार व ठराव भारतांतील राजधानीच्या महानगरपालिकेपासून तो गुन्नूर, बारामती, सारख्या छोट्या गांवांतील नगरपालिकेपर्यंत कोणाहि स्थानिक स्वराज्य संस्थांस करतां येईल. याचे परिणाम दूरगामी व भानगडी उत्पन्न करणारे होतील. राजकर्त्यांना जी चर्चा निर्विवाद टाळावयाची असेल तीच नेमकी चर्चा तारतम्य-दृष्ट्या अप्रबुद्ध सभासद हटकून करतील. ह्यायोगें राष्ट्रा–राष्ट्रांत तेढ होण्याचा संभव आहे. तिबेट, दलाई लामा व पंचम लामाचें निवेदन, पेकिंगचें भाष्य, यासंबंधीं नगरपालिकांनीं चर्चा केल्यास भारत सरकारास नगरपालिका अडचणींतच टाकतील व पंतप्रधानांस गोंधळांत पाडतील. स्थानिक सुखसोयी, आरोग्य, शिक्षण यांजकडे सदस्यांचें पुरेसें लक्ष जाणार नाहीं व गैरलागू बाबींवर त्यांचेमध्यें मतभेद होऊन कटुताहि निर्माण होईल. सबब "कामकाज" (Business) या शब्दाची व्याप्ति कायद्यानें स्पष्ट रीतीनें मर्यादित केली पाहिजे. सूर्याखालील जगांतील कोणत्याहि आंतरराष्ट्रीय बाबींपर्यंत नगरपालिकेला आपलें "कामकाज" पसरूं देऊं नये.

#### परदेशविषयांत लुडबुड व अतिक्रमण नको

सांप्रत लोकसभा व राज्यसभा ही राज्य सरकारचे विषय विचारांत घेऊं शकत नाहीं. राज्य कायदेमंडळेंहि मध्यवर्ति सरकारचे विषय चर्चेस घेऊं शकत नाहींत. याबाबत विषयांच्या याद्या कायद्यानें स्पष्ट केल्या आहेत. परंतु असें असतांहि या छोट्या स्थानिक प्रतिनिधी सभेवर नियंत्रण नसावें व त्याचे प्रस्ताव व विचारविषय निरंकुश असावेत हें असमर्थनीय, अतर्क्य होय.

दिल्लीच्या सुप्रीम कोर्टानें मुंबई हायकोर्टाचे बेंचचा निकाल बदलला नाहीं तर राज्यसरकारांनीं आपापल्या म्युनिसिपल कायद्यांत सुधारणा करून स्थानिक स्वराज्य संस्थांचे विचार-विषय व "कामकाज" हें वाहवलें जाणार नाहींत याबद्दल दक्षता घेतली पाहिजे.

---

## भडोचजवळ नवें रम्य विश्रांतिस्थान

भडोच शहरापासून बारा मैलांवर मुंबई राज्यांतील कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांसाठी मुंबई सरकारनें आणखी एक नवें विश्रांतिस्थान स्थापन केलें आहे. ह्या नव्या ठिकाणाचें नांव शुक्लतीर्थ असें आहे. ह्या स्थानाचें उद्घाटन करतांना मुख्य मंत्र्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी श्री. होमी तल्यारखान ह्यांनीं अशी माहिती दिली कीं मुंबई राज्यांत कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांसाठी अशा प्रकारचीं १२ स्थानें आतां तयार करण्यांत आलीं आहेत. त्यांपैकी आठ ठिकाणें उंच डोंगरावर असून तीन समुद्राच्या कांठीं वसलेलीं आहेत. शुक्लतीर्थाचा विशेष असा आहे कीं नदीच्या कांठीं स्थापन केलेलें विश्रांति स्थान तें पहिलेंच आहे. नदीच्या कांठीं सुटी मजेनें घालविण्यासाठी स्थापन केलेलें पहिलेंच ठिकाण असल्यानें एका दृष्टीनें त्याची स्थापना हा एक प्रयोगच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शुक्लतीर्थ नर्मदा नदीच्या तीरावर रम्य वनश्रीच्या आसमंतांत वसलेलें आहे. ह्या ठिकाणीं सर्व सुखसोयींनीं सज्ज अशा व्हावयाच्या २० खोल्या तयार ठेवल्या आहेत. त्याशिवाय आंब्याच्या बनांचा आधार घेऊन १० तंबूहि मिळण्यासारखे आहेत. सात जणांच्या कुटुंबाला दररोज ५० नया पैशापासून १ रुपयापर्यंत कोठल्याहि आकाराची जागा १५ दिवसांकरितां मिळूं शकेल. सुटींत येणाऱ्या पाहुण्यांच्या करमणुकीसाठी रेडिओ ऐकण्याची व सिनेमा दाखविण्याचीहि सोय करण्यांत आली आहे. त्याशिवाय एक मोठें वाचनालयहि उघडण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणीं येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था नीट होत आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठी दरसाल मार्च ते जून अखेर एका प्रवास-अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येणार आहे. गुजरातमधील गरीब लोकांना ह्या ठिकाणाचें आकर्षण वाटेल अशी अपेक्षा आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १३ मे, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

### लोकसभेंतील बिलामधील प्रमुख तरतुदी

लोकसभेमध्यें व्यापार–उद्योगमंत्रि श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांनीं कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल मांडलें आहे. १९५६ च्या कंपनी कायद्यांत सुधारणा करणें, हा त्याचा उद्देश आहे कायदा सुमारें एक वर्षभर अंमलांत राहिल्यानंतर, त्यांत दिसून आलेले दोष व उणीवा लक्षांत घेऊन दुरुस्त्या सुचविण्यासाठी सरकारनें शास्त्री कमिटीची योजना केली. नोव्हेंबर, १९५७ मध्यें कमिटीनें आपला अहवाल सादर केला, तो सरकारनें प्रसिद्ध केला, आणि पार्लमेंटापुढें मांडला. ह्या अहवालाच्या आधारानें प्रस्तुत बिल तयार करण्यांत आलें आहे.

बिलांत सुचविलेल्या दुरुस्त्यांचे तीन भाग करतां येतील:— (१) कायद्याच्या अंमलबजावणीमध्यें आढळलेल्या व्यावहारिक अडचणी दूर करणें, (२) कायद्याच्या अर्थाविषयीं उपस्थित झालेल्या शंका निवारण करून अर्थ स्पष्ट करणें, आणि (३) कायद्याचा उद्देश सफळ होण्याच्या मार्गातील अडचणी दूर करणें. प्रस्तुत बिलांत एकूण २१० कलमें आहेत.

परदेशांतील पब्लिक कंपनीची सबसिडिअरी कंपनी भारतांत नोंदविली असेल, तर ती आणि हिंदी पब्लिक कंपनीची सबसिडिअरी कंपनी ह्यांत आतां तफावत उरणार नाहीं नातेवाईकांची व्याख्या आतां बदलून त्या व्याख्येंत कमी नातेवाईक बसतील. पब्लिक कंपनीचे प्रायव्हेट कंपनींत रूपांतर करण्याच्या योजनांची सरकार छाननी करील. कंपनीचे शेअर्स दुष्ट हेतूनें मोठ्या प्रमाणावर घेणारांच्या मार्गांत अडचणी निर्माण केल्या जातील. डुप्लिकेट शेअर सर्टिफिकिटें देण्यावरील बंधनें कडक केलीं जातील; मूळ सर्टिफिकेट गहाळ झालें आहे, नाश पावलें आहे किंवा कंपनीकडे परत केलेलें आहे असें सिद्ध झाल्यावरच त्याच्या जागीं दुसरें सर्टिफिकेट देतां येईल. मॅनेजरचें वेतन निवळ नफ्याच्या ५% पेक्षा जास्त असूं शकणार नाहीं. कंपनीच्या सभेंत चेअरमननें केलेलें भाषण कंपनीच्या खर्चानें प्रसिद्ध केलें जातें, पण सभेंत झालेल्या चर्चेची माहिती त्यांत दिली जात नाहीं. अशा एकतर्फी प्रसिद्धीकरणास आळा घालण्यासाठी योजना करण्यांत आला आहे; चेअरमनच्या भाषणाबरोबर सभेंतील कामकाजाचाहि तपशील यायला हवा. ह्यापुढें कोणत्याहि कंपनीला एकापेक्षा अधिक मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स किंवा मॅनेजर नेमतां येणार नाहींत. डिव्हिडंड देण्यापूर्वी घसारा काढणें कंपन्यांवर बंधनकारक होईल डिव्हिडंड हें रोखीनेंच वाटावें लागेल. ६५ व्या वर्षाच्या आधीं ज्याची डायरेक्टर म्हणून निवड झाली असेल, त्याला ६५ वें वर्ष लागलें म्हणून केवळ आपली जागा खाली करावी लागणार नाहीं. मॅनेजिंग एजंटाच्या जागेचा राजीनामा दिल्यावर तीन वर्षेपर्यंत सोल सेलिंग एजंट नेमतां येणार नाहीं.

## भारताच्या निर्यात व्यापारांत घट झाल्यानें चिंता

भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जे पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत व अंमलांत आणण्यांत येत आहेत त्यांच्या यशस्वी पूर्तीसाठी परदेशांतून भांडवली स्वरूपाचा माल आयात करावा लागतो. ह्या मालाची किंमत देण्यासाठी भारतालाहि निर्यात करावी लागते. ही निर्यात वाढविण्यासाठी कांहीं निर्यात वृद्धी–समित्याहि स्थापन करण्यांत आल्या आहेत. तरी पण गेल्या कांहीं महिन्यांत भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या मालांत घट झाल्यामुळें कांहींसें चिंतेचें वातावरण निर्माण झालें आहे. गेल्या कांहीं महिन्यांत भारताच्या निर्यातींत बरीच घट झालेली आहे ह्या घटनेला अनेक कारणें आहेत. देशांतील वाढती मागणी हें त्यांपैकी एक कारण आहे. भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या मालांत मँगेनीझची माती, सुती कापड आणि तेलबिया ह्या मालाला बरेंच महत्त्व आहे. मँगेनीझच्या निर्यातींत अलीकडे भारताला ब्राझिलशीं स्पर्धा करावी लागत आहे. अमेरिकेंतील पोलादाचे कारखाने आपली मँगेनीझची गरज बहुधा ब्राझीलकडून पुरी करून घेत आहेत. मँगेनीझच्या वाहतुकीच्या बाबतींत ब्राझील सवलती देत आहे. एक टन मँगेनीझची वाहतूक करण्यास भारताला जितका खर्च येतो, त्यापेक्षा ब्राझिलची वहातूक ६ डॉलर्सनीं कमी खर्चाची आहे. शिवाय पोलादाच्या निर्मितींत अलीकडे मँगेनीझची गरज कमी कमी होऊं लागली आहे. ही गरज जवळ जवळ नाहींशीच होत आली आहे. कापडाच्या निर्यातीची परिस्थितीहि समाधानकारक नाहीं. ह्या धंद्याची तेजीची परिस्थिति आतां राहिलेली नाहीं. जपान अधिक चांगल्या दर्जाचें कापड काढूं लागला असून जपानी मालाची नेहमीं भारताच्या हातीं असलेल्या बाजारपेठांत आतां तीव्र स्पर्धा होऊं लागली आहे. त्याशिवाय आशिआंतील कांहीं देशांनीं आपला स्वतःचा कापडाचा धंदा उभारला आहे. कांहीं देश आपली निर्यात वाढविण्यासाठी खास प्रयत्न करीत आहेत जे उद्योगधंदे आपला माल निर्यात करून परदेशी चलन मिळवितात त्यांना आपल्या परदेशी चलनाच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग मोकळेपणानें वापरण्याची परवानगी देण्यांत येते. भारताला आपल्या चलनाची देशांतील व देशाबाहेरील किंमत स्थिर राखावयाची आहे. त्यामुळें निर्यात वाढीसाठी अशा प्रकारचीं प्रलोभनें ठेवणें शक्य होणार नाहीं.

तेलबियांची मागणी देशांतील बाजारपेठांतून बरीच वाढत चाललेली आहे. पण, उत्पादन मात्र वाढलेलें नाहीं. त्यामुळें निर्यात करण्यास फारसा मालच शिल्लक राहत नाहीं. ह्या परिस्थितीची सरकारला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच निर्यातीसंबंधींचें धोरण लवचिक ठेवण्यांत येऊन वेळोवेळीं बदलण्यांत येत असतें. भारतामधील विकासाची सध्यांची गति कायम टिकविण्यासाठी निर्यात व्यापाराचें फार महत्त्व आहे. निर्यात

वाढविण्यासाठी सरकार जे प्रयत्न करीत आहे त्यांना देशांतील उत्पादकांकडूनहि सहकार्य मिळण्याची आवश्यकता आहे. कांहीं मालाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी सरकारनें बऱ्याच सवलती दिलेल्या आहेत. निर्यात मालावर घेण्यांत येणाऱ्या जकातींत आणखी कपात करण्यांत यावी, अशा प्रकारच्या सूचना कांहीं लोकांकडून करण्यांत येत आहेत. तथापि ह्या बाबतींत आणखी कांहीं करतां येण्यासारखें नाहीं. भारतामधील चहा परदेशी बाजारपेठांत लवकरच आक्रमक धोरण स्वीकारणार आहे. ह्या चढाईत चहाला यश येईल अशी अपेक्षा आहे.

---

**ब्रह्मदेशाकडून तांदळाची आयात**—१९५६ सालीं भारत व ब्रह्मदेश ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें भारत ब्रह्मदेशांकडून पांच वर्षांच्या काळांत २० लाख टन तांदूळ आयात करणार आहे. १९५९ सालीं भारत ३·५ लाख टन तांदूळ आयात करणार आहे. ह्या तांदुळांचा दर ठरविण्यासाठी भारत सरकारच्या अन्नखात्यातर्फे तीन जणांचें मंडळ ब्रह्मदेशाला गेलें आहे.

**हिंदी कलेचें प्रदर्शन**—पश्चिम जर्मनीमधील एसेन येथें हिंदी कलाकृतींचें एक प्रदर्शन मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत मुख्यतः शिल्पकृतींचा समावेश करण्यांत आला आहे. प्राचीन शिल्पाच्या व इतर २०० कलाकृती भारतांतून पाठविण्यांत आल्या आहेत. सर्व कलाकृतींची किंमत अंदाजें १४ लाख रुपये आहे.

**प्राचीन हस्तलिखितांचें संशोधन**—राजस्तान पुरातत्व मंदिर ह्या संस्थेनें सुमारें १२०० प्राचीन हस्तलिखितांचा संग्रह केला आहे. ह्या संग्रहांत ज्योतिष आयुर्वेद, वाङ्मय, कला, इत्यादि विषयांवरील प्राचीन ग्रंथ आहेत. ह्या हस्तलिखितांचें संपादन करून तीं पुस्तकांच्या स्वरूपांत प्रसिद्ध करण्यात येतात गेल्या नऊ वर्षांत अशीं ३४ पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

**बिलाला परवानगी नाकारली**—ज्या जोडप्याला तीन पेक्षा अधिक मुलें होतील त्या जोडण्याला व २१ वर्षें पूर्ण होण्याच्या आधीं लग्न करणाऱ्या स्त्री-पुरुषांना दंडाची शिक्षा देणारें बिल लोकसभेंत आणण्याचा प्रयत्न बहुमतानें फेटाळून लावण्यांत आला. असा कायदा मंजूर झाल्यास गृहस्वास्थ्य धोक्यांत येईल, असें सरकारचें म्हणणें आहे.

**औद्योगिक व तांत्रिक म्युझिअम**—कलकत्ता शहरांत भारतामधील पहिलें औद्योगिक व तांत्रिक म्युझिअम स्थापन करण्यांत आलें आहे. म्युझिअमच्या स्थापनेसाठी बिर्ला उद्योग पतींनीं एक तीन मजली इमारत देणगी म्हणून दिली आहे. कलकत्त्याच्या दक्षिण भागांत स्थापन करण्यांत आलेल्या ह्या म्युझिअमसाठी २० लाख रुपये लागले आहेत.

**ग्रामोद्योगाला उत्तेजन**—ग्रामोद्योगांत तयार करण्यांत आलेल्या वस्तूंचा जास्तींत जास्त उपयोग करून ग्रामोद्योगाला उत्तेजन देण्याचें धोरण सरकारनें ठरविलें आहे. ह्या बाबतींत योजावयाच्या उपायांची घोषणा सरकारतर्फे लवकरच करण्यांत येणार आहे. मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या वस्तूंबरोबरच्या स्पर्धेत ग्रामोद्योगाच्या वस्तू टिकत नाहींत.

**श्री. वा. काळे ह्यांच्या 'पुढे पाऊल'ला इंदूरच्या मराठी ग्रंथोत्तेजक मंडळाचा पुरस्कार**

मराठी भाषेंत निर्माण होणाऱ्या उत्कृष्ट साहित्याला उत्तेजन देण्यासाठी पुरस्कारादाखल मध्यप्रदेश सरकारकडून इंदूरच्या महाराष्ट्र साहित्यसभेला रक्कम मंजूर केली जाते. त्यांतून श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या "पुढे पाऊल" ह्या पुस्तकाला ५० रु. चा पुरस्कार मराठी ग्रंथोत्तेजक मंडळानें दिला आहे.

---

**भारतांतील पैशाचा पुरवठा**

| शेवटचा आठवडा | कोटी रुपये |
|---|---|
| १९५४ | १८४८·८९ |
| १९५५ | २०४७·१५ |
| १९५६ | २१७८·३० |
| १९५७ | २२७४·९२ |
| १९५८ | २३४९.८४ |

---

**रिझर्व्ह बँकेजवळील सोनें व विदेशी रोखे**
( आंकडे कोटी रुपयांचे )

| शेवटचा आठवडा | सोनें | विदेशी रोखे | एकूण |
|---|---|---|---|
| १९५४ | ४०·०२ | ७३०·७९ | ७७०·८१ |
| १९५५ | ४०·०२ | ७३५·१७ | ७७५·१९ |
| १९५६ | ११७·७६ | ५२९·९१ | ६४७·६७ |
| १९५७ | ११७·७६ | २९७·६५ | ४१५·४१ |
| १९५८ | ११७ ७६ | १७७·५१ | २९५ २७ |


**सुरक्षित व किफायतशीर गुंतवणूक**

अल्प रकमांवर आकर्षक व्याज मिळविण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजेच

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.** चीं

३ व ५ वर्षें मुदतीचीं कॅशसर्टिफिकिटें
प्रत्येकी रु. १००, रु. ५०० व रु. १००० चीं सर्टिफिकिटें.

★ तीन वर्षांच्या मुदतीस व्याजाचा दर चक्रवाढ व्याजानें द. सा. द. शें. चार व पांच वर्षांच्या मुदतीस सव्वाचार पडतो.

★ ★ ★

**यवतमाळ व खामगांव**

येथें अक्षयतृतीयेच्या सुमुहूर्तावर दि. १० मे १९५९ रोजीं बँकेच्या शाखा सुरू झाल्या आहेत.

★ ★

या शाखा धरून बँकेच्या महाराष्ट्रांत व अन्यत्र ४६ शाखा होतात. त्यांचा जनतेनें फायदा घ्यावा.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं वि. जोग,
मॅनेजर.

कोंकणची कामधेनु

## दिवा-दासगांव रेल्वे

श्री. मनोहर ना. गोगटे, बी. एससी. ( टेक् ), जे पी.

इतकीं वर्षे आपण आग्रहपूर्वक मागणी करीत होतों ती कोंकण रेल्वे आतां स्वप्नवत् राहिलेली नसून लवकरच प्रत्यक्षांत येणारी गोष्ट ठरणार आहे. अशा वेळीं कोंकण रेल्वेचें स्वरूप काय राहणार आहे आणि ती सुरू झाल्यावर कोंकणचा कसा कायापालट होणार आहे, याची उद्बोधक व आंकडेवारीनिशीं माहिती प्रस्तुत लेखांत दिली आहे. प्राधान्येंकरून या लेखांत दिवा-दासगांव या पहिल्या टप्प्याचीच माहिती दिली आहे.

मंगळवार, तारीख ३ मार्च, १९५९ हा दिवस कोंकणाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल. त्या दिवशीं भारताच्या लोकसभेमध्यें केंद्रीय रेल्वेमंत्रि नामदार जगजीवनराम यांनीं दिवा-दासगांव रेल्वेयोजना ताबडतोब हातीं घ्यावयाची असा रेल्वे बोर्डानें निर्णय घेतल्यासंबंधीं घोषणा केली. कोंकणांतून जाणाऱ्या व मुंबई-मंगळूर हा दुवा सांधणाऱ्या पश्चिम किनाऱ्यालगत रेल्वेचा दिवा दासगांव हा पहिला टप्पा होय.

दिवा-दासगांव रेल्वेचें बांधकाम हातीं घेण्याबरोबरच दासगांव ते चिपळूण या दुसऱ्या टप्प्याचीहि रेल्वेनें स्थापत्यविषयक व वाहतूकविषयक पाहणी ताबडतोब हातीं घ्यावयास हवी.

चिपळूणला कारखानदारी वाढविण्यास पोषक अशी परिस्थिति असून कोयना योजनेच्या पूर्तीबरोबर येथें औद्योगीकरण झपाट्यानें होण्यासारखें आहे. फेब्रुवारी १९५९ मध्यें मुंबई येथें भरलेल्या कोंकण विकास परिषदेनेंहि दासगांव–चिपळूण सर्व्हे हातीं घेण्यासंबंधीं विनंतीवजा मागणी रेल्वे खात्याकडे केली असून मुंबई प्रादेशिक काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. के. के. शहा यांच्या सारख्या वजनदार व्यक्तींकडूनाहि या मागणीला जोरदार पुरस्कार मिळालेला आहे. रेल्वे खात्यानें या मागणीचा अवश्य सहानुभूतिपूर्वक विचार करावा.

दिवा–दासगांव रेल्वेची बांधणी ताबडतोब हातीं घेतली जाणार असून त्या दृष्टीनें जमिनी मिळविणें व प्राथमिक बांधणी काम सुरू व्हावयास हवें. रेल्वेला लागणाऱ्या जमिनी देण्यासाठी जनतेनें संपूर्ण सहकारी वृत्ति दाखविली पाहिजे. या बाबतींत स्वार्थी दृष्टि ठेवून दिरंगाई व विलंब लावतां कामा नये. ताबडतोब काम सुरू झाल्यास १९६१–६२ पावेतों दिवा–पनवेल फांटा कार्यवाहींत आणणें सहज शक्य आहे पनवेल–दासगांव फांटा १९६४–६५ पर्यंत पूर्ण व्हावा. तेव्हां रेल्वेला जनतेनें सर्वतोपरीं सहकार्य देणें जनहिताचेंच आहे.

रेल्वे बोर्डानें दिवा-दासगांव योजनेला मान्यता दिली आहेच. भारतीय नियोजन मंडळहि या योजनेवर शिक्कामोर्तब करील अशी बळकट आशा आहे.

दिवा ते दासगांव हें अंतर ९३·२४ मैल असून दिवा हें स्टेशन मेन लाईनवर आहे. नवीन रेल्वे दिव्याहून तळोजा व पनवेलवरून आपटें या गांवीं जाईल. पनवेलच्या थोडें पुढें ही रेल्वे मुंबई-पुणें या नॅशनल हायवेला ( राष्ट्रीय हमरस्ता ) ओलांडून जाईल. आपटें स्टेशनानंतर पाताळगंगा नदी ओलांडून रेल्वे लाईन पेणला पोहोंचेल. या लाईनच्या पश्चिमेस पनवेल-महाड रस्ता राहील ही रेल्वे नंतर पनवेलहून नागोठण्यापर्यंत मुंबई-कोंकण गोवा रस्त्याला समांतर मार्गे जाईल व सदर रस्त्याला नागोठण्याजवळ ओलांडून भिसी खिंडमार्गे रोह्याला पोंचेल. मागे रोह्याजवळ कुण्डलिका नदी ओलांडून रेल्वेमार्ग पूर्वेला कोलाडला पोंहोचेल. कोलाडच्या पलीकडे रेल्वेलाईन महाडच्या रस्त्याला जवळजवळ समान्तर मार्गानें दासगांवपर्यंत जाईल. माणगांव आणि दासगांव यांच्यामध्यें मात्र रेल्वेलाईन महाड रस्त्यापासून जुला सरकून महाड रस्त्यापासून दोन मैलांवर गोरेगांवला मिळेल. गोरेगांवहून आग्नेय दिशेस नंतर हा रेल्वेमार्ग दासगांवपर्यंत जाईल.

दिवा ते दासगांवपर्यंत खालीलप्रमाणें स्टेशन्स लागतील:—

| स्टेशनें | दिव्यापासून मैलीं अंतर |
|---|---|
| तळोजा | ९·५४ |
| पनवेल | १५·९७ |
| आपटें | २५·७४ |
| पेण | ३८·०८ |
| कसू | ४६·७६ |
| नागोठणें | ५४·८७ |
| रोहें | ६४·३६ |
| कोलाड | ६९·१२ |
| इन्दापूर | ७३·१२ |
| माणगांव | ८२·१२ |
| गोरेगांव बंदर | ८८·३७ |
| दासगांव | ९३·२४ |

कसू हें स्टेशन सोडून बाकी सर्व स्थानकांवर उतारू व माल या दोहोंच्या वाहतुकीची सोय होईल. कसूला फक्त उतारूंची सोय करण्यांत येईल. स्थूलमानानें हीं सर्व स्टेशनें त्या त्या गांवांच्या नजीकच असतील. आपटें स्टेशन मात्र आपटें गांवापासून उत्तरेला सुमारें १॥ मैल दूर राहील. पनवेल, पेण व रोहें या ठिकाणीं इंजिनला पाण्याची सोय करावी लागेल.

दिवा-दासगांव रेल्वेच्या दोन्ही बाजूंकडील ६ मैलांच्या पट्टींत सुमारें पावणेचार लक्ष लोकवस्ती असून या परिसरांत २,००० पेक्षां अधिक लोकवस्तीचीं खालील गांवें मोडतात:—

तळोजा (२२३९), शहाबाद (३२२८), पनवेल (१४,८६१), चिरनेर ( २१२९ ), कोप्रोळी ( २,७२५ ), रावें ( २,१३३ ), दादर ( २,४१८ ), जोहें ( ३,०९५ ), वाढाव ( २,७०६ ), पेण ( ९,३३० ), शहापूर ( २,१८२ ), नागोठणें ( ३,०६४ ), पाली ( ३,३९६ ), रोहें ( ६,८८० ), तळें ( ३,८०७ ), मोरवें ( २,८६२ ), गोरेगांव ( ३,६७८ ), दासगांव (२,३६१ ), आंकडे १९५१ च्या खानेसुमारीचे आहेत. दासगांवहून महाड ५ मैलांवर असून महाडची लोकवस्ती ११,११६ आहे.

दिवा-दासगांव रेल्वेला एकूण आठ नद्या ओलांडाव्या लागतील. त्यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे:—

| नदी | दिव्यापासून सुमारें मैल |
|---|---|
| बावा मलंग | १० |
| काळुंद्री | १६॥ |
| पाताळगंगा | २७ |
| बाळगंगा | ३३ |
| भोगेश्वरी | ३७ |
| अंबा | ५५॥ |
| कुंडलिका | ६३ |
| काळ | ८२॥ |

दिवा-दासगांव रेल्वेच्या परिसरांत बरींच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळें, किल्ले वगैरे असून ही रेल्वे झाल्यानंतर यापैकीं कांहीं किल्ले हवेचीं ठिकाणें म्हणून वाढवितां येतील. माणगांवच्या वायव्येस बौद्धकालीन कुडयाचीं लेणीं असून महाडच्या वायव्येकडेहि पाल्याच्या प्रसिद्ध बुद्धगुंफा आढळतात. नागोठण्याजवळ उन्हेरी येथें व दासगांवजवळ सात्र आणि कोण्डिविटी येथें गरम पाण्याचे झरे आहेत.

| किल्ल्याचें नांव | रेल्वे स्टेशनापासून अंतर |
|---|---|
| कर्नाळा | ७ मैल ( आपटे ) |
| माणिकगड | ४ मैल ( आपटे ) |
| सांक्षी | ५ मैल ( पेण ) |
| सरसगड | ७ मैल ( नागोठणें ) |
| सुधागड | ११ मैल ( नागोठणें ) |
| अवचितगड | ३ मैल ( रोहें ) |
| घोसाळगड | ६ मैल ( रोहें ) |
| सुरगड | ८ मैल ( रोहे ) |
| रायगड | १७ मैल ( दासगांव ) |
| मंगलगड | १७ मैल ( दासगांव ) |

**दप्तरदिरंगाईचा परिणाम**—वडवाण येथील एका शाळेला एका दानशूर गृहस्थानें १०,००० रुपयांची देणगी देऊं केली होती. तिचा उपयोग गरीब मुलांच्या फीसाठी करावयाचा होता. पण शाळेचे मुख्याध्यापक व मुंबई सरकारचे शिक्षणखातें ह्यांच्यांत ह्यासंबंधीं सहा महिने पत्रव्यवहार होऊनहि निर्णय लागला नाहीं. परिणामीं रक्कम मिळालीच नाहीं.

**ब्रह्मदेशांतील तांदुळाची आयात**—ब्रह्मदेश भारताला चालू वर्षी व पुढील वर्षी प्रत्येकी २५०,००० टन तांदूळ द्यावयास तयार आहे. १९१८ सालीं दर टनाला ३२ पौंड ह्या दरानें खरेदी करण्यांत आली होती पण चालू सालीं जगांतील तांदुळाच्या किंमती चढल्या आहेत, ह्या सबबीवर ब्रह्मदेश दर टनाला ३४ पौंड मागत आहे.

**बेकायदा यंत्रमागांविरुद्ध उपाय** मुंबई राज्यांत ४०,००० बेकायदा यंत्रमाग वापरण्यांत आहेत, असा अंदाज आहे. ह्या मागाच्या वापराविरुद्ध अहमदाबाद गिरणीमालकसंघानें तक्रार केली आहे. असे माग सीलबंद करण्याचा सध्यांचा कायदा अपुरा पडत असल्यामुळें सरकार कायद्यांत दुरुस्ती करण्याचा विचार करीत आहे.





मोहनराव आज पासून एकटे नाहींत.
राजाराणीचा नवा सुखाचा संसार सुरू होणार
नी थोड्याच दिवसांत युवराजहि या राज्यांत
येणार; मग आनंदाला काय पारावार ?
हाच आनंद जन्मभर कायम राखण्यासाठीं
आर्थिक सुरक्षिततेची फारच आवश्यकता असते
विमा एजंट आपणांस त्यासाठीं योग्य ती
योजना सुचवूं शकेल.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

## कै. श्री. कृ. ज. जोशी

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सें. को. बँक लि., अहमदनगर, ह्या बँकेचे जनरल मॅनेजर श्री. कृ. ज. जोशी, हे मुंबई मुक्कामीं दि. ४ रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. बँकेच्या डायरेक्टर बोर्डाच्या व सेवक वर्गाच्या संयुक्त सभेंत केलेल्या ठरावावरून त्यांच्या कर्तबगारीची थोडक्यांत कल्पना येईल. तो ठराव असा :—"कै. जोशी ह्यांनीं बँकेचे कारकून म्हणून सुरुवात करून जनरल मॅनेजर ह्या उच्चाधिकाराची जागा आपल्या अंगच्या चिकाटी, निरलस व सचोटी ह्या गुणांनीं व कर्तृत्वानें मिळविली; व बँकेचे प्रमुख म्हणून गेल्या २५ वर्षांचा कारभार हांकून सहकारी क्षेत्रांत बँकेस उत्तम लौकिक मिळवून दिला, व मुंबई राज्य सहकारी जगतांत अभिमानास्पद स्थान पटकाविलें."

---

**The Travancore Ogale Glass Mfg. Co. Ltd.**

# NOTICE

The Sixteenth Annual General Meeting of the shareholders of The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Friday, the 12th June, 1959, at 4 p. m. to transact the following business :

1. To read the Notice and Auditors' Report.
2. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December 1958.
3. To sanction the declaration of a dividend.
4. To elect a Director in place of Sri. A. Raghunatha Rao who retires by rotation and being eligible, offers himself for re-election.
5. To elect a Director in place of Sri. S. Chattanatha Karayalar who retires by rotation and being eligible, offers himself for re-election.
6. To elect a Director in place of Sri. H. Bhagwandas who retires under Article 107, and being eligible, offers himself for re-election.
7. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 1st June to Friday, the 12th June, 1959, both days inclusive.

A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when poll is demanded and the proxy need not be a member.

By order of the Board
For **OGALE BROS.** ( Private ) LTD.

| | |
|---|---|
| Manjummel,<br>Alwaye,<br>April 9, 1959. | Managing Agents,<br>**N. P. Ogale,**<br>Director. |

**The dividend, when sanctioned, will be made payable on and after July 13, 1959, to those shareholders whose names stand on the Register on Friday, the 12th June, 1959.**

---

**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

# ★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

---

**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४

---

## कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

---


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८ | सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४. | टेलिफोन ७०२८

*भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.*

विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याही शाखेत मिळेल.

शाखा :- फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · बेळगांव.
महिला शाखा :- सारस्वत बँक गृह, गिरगांव-मुंबई ४.

---



# किर्लोस्कर
## इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.
[illegible]
[illegible]
सविस्तर माहितीसाठी लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा**

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.<br>ता. ११-७-५७

वा. ग. आळतेकर<br>कार्यकारी संचालक



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंद्रुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी<br>मॅनेजर.



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष<br>मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष<br>रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड<br>मॅनेजिंग डायरेक्टर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक ) (६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.<br>नी. ना. क्षीरसागर<br>मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.